# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान काळातील चौथा रविवार

### सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना : सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** प्रभो, आमचे ओठ उघड.
प्रतिसाद: आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत :** प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया.

**स्तोत्र १००**

**अ**हो पृथ्वीवरील सर्व लोकहो,
परमेश्वराचा जयजयकार करा,
हर्षाने परमेश्वराची सेवा करा,
गीत गात त्याच्यापुढे या. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**प**रमेश्वर हाच देव आहे हे जाणा;
त्यानेच आम्हाला उत्पन्न केले;
आम्ही त्याचेच आहो,
आम्ही त्याची प्रजा, त्याच्या कुरणातील कळप आहो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**त्या**चे उपकार स्मरण करीत,
त्याच्या द्वारात स्तवन करीत त्याच्या अंगणात प्रवेश करा;
त्याचे उपकारस्मरण करा;
त्याच्या नावाचा धन्यवाद करा. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**का**रण परमेश्वर चांगला आहे;
त्याची दया सनातन आहे आणि
त्याची सत्यता पिढयान्‌पिढया टिकते. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत : प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया.

गीत ः इस्टर गीत

प्रतिगीत १: मी मरणार नाही. मी जगेन आणि प्रभूने केलेल्या अद्‌भुत कृत्यांचे स्मरण करीन, आल्लेलुया.

स्तोत्र ११८

परमेश्वराचे उपकारस्मरण करा
कारण तो चांगला आहे;
कारण त्याची दया सनातन आहे.

आता इस्त्राएलाने म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.
अहरोनच्या घराण्याने म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.
परमेश्वराचे भय धरणाऱ्यांनी म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.

अडचणीत असताना मी परमेशाचा धावा केला;
तो ऐकून परमेशाने मला प्रशस्त स्थळी नेले.
परमेश्वर माझ्या पक्षाचा आहे; मी भिणार नाही.
मनुष्य माझे काय करणार?
माझा साहाय्यकर्ता परमेश्वर माझ्या पक्षाचा आहे;

मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे.
अधिपतींवर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे.

सर्व राष्ट्रांनी मला घेरिले आहे;
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.
त्यांनी मला घेरिले आहे;
खरोखर मला घेरिले आहे;
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.

त्यांनी मला मधमाश्यांप्रमाणे घेरिले आहे;
कांटयाकुटयांच्या आगीप्रमाणे ते विझून जातील.
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.

**मी** पडावे म्हणून तू मला जोराने धक्का दिला,
पण परमेश्वराने मला सावरिले आहे.
परमेश्वर माझे बल, माझे गीत आहे;
तो माझे तारण झाला आहे.
उत्सवाचा व तारणाचा शब्द नीतिमानांच्या वस्तीत आहे:

**प**रमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो.
परमेश्वराचा उजवा हात उभारिलेला आहे;
परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो.
मी मरावयाचा नाही, तर जगेन,
आणि परमेश्वराच्या कृत्यांचे वर्णन करीन.
परमेशाने मला जबर शासन केले;
तरी मला मृत्युच्या हवाली केले नाही.

**मा**झ्यासाठी नीतिमत्त्वाची द्वारे उघडा
म्हणजे मी त्यातून प्रवेश करून परमेशाचे उपकारस्मरण करीन.
हे परमेश्वराचे द्वार आहे;
ह्यातून नीतिमान प्रवेश करोत.
तू माझे ऐकले आहे;
तू माझे तारण झाला आहेस,
म्हणून मी तुझे उपकारस्मरण करितो.

**बां**धणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड कोनशिला झाला आहे.
ही परमेश्वराची करणी आहे;
ती आमच्या दृष्टीने अद्भुत आहे.
परमेश्वराने नेमिलेला दिवस हाच आहे.
ह्यांत आपण उल्हास व आनंद करू.

**हे** परमेश्वरा, आम्ही तुला विनवितो की, आमचे तारण कर.
हे परमेश्वरा, आम्ही तुला विनवितो की, आमचा उत्कर्ष कर.
परमेश्वराच्या नावाने येणारा धन्यवादित असो.

परमेश्वराच्या घरातून आम्ही तुम्हास आशीर्वाद देतो.
परमेश्वर देव आहे, त्याने आपल्याला प्रकाश दिला आहे.

उत्सवाचा यज्ञपशू वेदीच्या शिंगांस दोऱ्यांनी बांधा.
तू माझा देव आहेस;
मी तुझे उपकारस्मरण करीन;
हे माझ्या देवा, मी तुझी थोरवी गाईन;
परमेश्वराचे उपकारस्मरण करा;
कारण तो चांगला आहे.
कारण त्याची दया सनातन आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: मी मरणार नाही. मी जगेन आणि प्रभूने केलेल्या अद्भुत कृत्यांचे स्मरण करीन, आल्लेलुया.

***********

प्रतिगीत २: तुझे गौरवशाली व पवित्र नाव धन्य असो, आल्लेलुया.

काव्य - तीन युवकांचे गीत: २९ - ३५

हे प्रभो, आमच्या पूर्वजांच्या देवा, तू धन्य आहेस.
सर्वकाळ तुझी स्तुती असणे आणि प्रशंसा होणे योग्य आहे.

तुझे वैभवशाली आणि पवित्र नाम धन्य,
त्याची मोठी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

तुझ्या पवित्र वैभवाच्या मंदिरामध्ये तू धन्य.
त्याची वाखाणणी होवो. त्याचे वैभव सर्वकाळ पसरो.

खेरूबावर आरूढ होऊन गर्तेतही दृष्टी टाकणाऱ्या तू धन्य,
तुझी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

आपल्या राज्याच्या सिंहासनारूढ असणाऱ्या तू धन्य,
तुझी वाखाणणी होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

सर्व दूत आणि संतगण तुला धन्यवाद देवोत,
तुझी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

स्वर्गामधून, पृथ्वीवरून व समुद्रामधून तुझी स्तुती होवो
आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २: तुझे गौरवशाली व पवित्र नाव धन्य असो, आल्लेलुया.

***********

प्रतिगीत ३: देवाचा महिमा वर्णन करा. प्रभूची कृत्ये परिपूर्ण आहेत आणि त्याचे सर्व मार्ग उचित आहेत, आल्लेलुया.

स्तोत्र १५०

परमेश्वराचे स्तवन करा.
देवाचे त्याच्या पवित्रस्थानी स्तवन करा;
त्याच्या सामर्थ्याच्या अंतराळात त्याचे स्तवन करा.
त्याच्या पराक्रमाच्या कृत्यांबद्दल त्याचे स्तवन करा;
त्याच्या थोरवीच्या वैपुल्यानुसार त्याचे स्तवन करा.

कर्णा वाजवून त्याचे स्तवन करा.
सतार व वीणा वाजवून त्याचे स्तवन करा.
डफ वाजवून व नृत्य करून त्याचे स्तवन करा.
तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्याचे स्तवन करा.

खणखणणारे टाळ वाजवून त्याचे स्तवन करा.
झणझणणाऱ्या झांजा वाजवून त्याचें स्तवन करा.
प्रत्येक प्राणी परमेशाचे स्तवन करो.
परमेशाचे स्तवन करा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत ३: देवाचा महिमा वर्णन करा. प्रभूची कृत्ये परिपूर्ण आहेत आणि त्याचे सर्व मार्ग उचित आहेत, आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** **प्रे.कृ. १०:४० - ४३**

त्याला देवाने तिसऱ्या दिवशी उठविले व त्याने प्रगट व्हावे असे केले. तरी हे प्रकटीकरण सर्व लोकांना नव्हे, पण जे साक्षी देवाने पूर्वी निवडले त्या आम्हाला केले; त्या आम्ही तो मेलेल्यांतून उठल्यानंतर त्याच्याबरोबर खाणेपिणे केले. त्याने आम्हाला अशी आज्ञा केली की, लोकांस उपदेश करा व अशी साक्ष द्या की, देवाने नेमलेला असा जिवंतांचा व मेलेल्यांचा न्यायाधीश तो हाच आहे. त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: तू मरणातून जिवंत झाला आहेस.
प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** मी कळपाचा मेंढपाळ आहे. मी मार्ग, सत्य व जीवन आहे. मीच उत्तम मेंढपाळ आहे. मी माझ्या मेंढरांना ओळखतो आणि माझी मेंढरे मला ओळखतात, आल्लेलुया.

जखऱ्याचे स्तोत्र

इस्त्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची 'खंडणी भरून सुटका' केली आहे;

आणि आपल्यासाठी त्याने आपला दास 'दावीद'
ह्याच्या घराण्यात 'बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;'

म्हणजे आपल्या 'शत्रूंच्या' व आपला 'द्वेष करणाऱ्या'
सर्वांच्या 'हातून' सुटका करावी;
अशासाठी की, 'आपल्या पूर्वजांवर' त्याने 'दया' करावी.

आणि त्यानें ‘आपला’ पवित्र ‘करार’ म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज ‘अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली’, ती ‘स्मरावी’,

**ती** अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

**आ**णि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण ‘प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे’ चालशील;

**ह्या**साठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.
आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

‘**ह्या**साठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा’,
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** मी कळपाचा मेंढपाळ आहे. मी मार्ग, सत्य व जीवन आहे. मीच उत्तम मेंढपाळ आहे. मी माझ्या मेंढरांना ओळखतो आणि माझी मेंढरे मला ओळखतात, आल्लेलुया.

## विनंत्या

**प्रतिसाद:** हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

**आ**पण सर्वसमर्थ परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याने आपला प्रमुख आणि तारणारा येशू ह्याला मरणातून उठविले. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

**हे** पित्या, तू तुझ्या पुत्राला मृत्यूच्या अंधारातून वैभवाच्या प्रकाशात आणलेस. - आम्हाला तुझ्या अद्भुत प्रकाशात प्रवेश दे. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

**ये**शू ख्रिस्तावरील श्रद्धेने तू आमचे तारण केले आहेस. - आज आम्हाला आमच्या बाप्तिस्म्याच्या कृपेत जगण्यास सहाय्य कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

**आ**म्ही स्वर्गीय गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करावा असे तू आम्हाला सांगितले आहेस. आम्हाला पापाच्या आकर्षणाशी प्रतिकार करण्यास मदत कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

ख्रिस्तामध्ये दडलेल्या गुप्त गोष्टी आम्हाला प्रकट कर. - माणसांनी नवे आकाश व नवी पृथ्वी ह्यांची चिन्हे ओळखावीत अशी कृपा कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हाला ख्रिस्ताच्या गौरवाने गौरवित कर.

आमच्या स्वर्गीय बापा...

## समारोपाची प्रार्थना

सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, आमचा मेंढपाळ ख्रिस्त ह्याच्याकडून आम्हाला शक्ती दे व तुझ्या संतांमध्ये समावेश करण्यास आम्हाला स्वर्गाकडे ने. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्व काळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.